# के जे’स एज्युकेशनल इन्स्टिट्युट, पुणे

---

## "केजेईआय शिष्यवृत्ती योजना शै.वर्ष २०१७-१८"

१. शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांस भराव्या लागणा-या ट्युशन फी (शिक्षण शुल्क)मध्ये सवलत म्हणून देण्यात येईल.

२. शासकीय वा अन्य योजनेतून मिळणा-या "फी" च्या परताव्यावर ही शिष्यवृत्ती लागू होणार नाही.

३. शासकीय प्रवेश प्रक्रियेत गुणवत्ता यादीसाठी ग्राहय धरल्या जाणा-या गुणांवर ही शिष्यवृत्ती अवलंबून आहे.

४. प्रथम वर्ष पदवी प्रवेशासाठी फिजिक्स, केमिस्ट्री व गणित या विषयात महाराष्ट्र राज्याच्या बारावीचे (किंवा समकक्ष परिक्षेत) एकाच प्रयत्नात मिळालेल्या एकत्रित गुणांचा शिष्यवृत्तीसाठी विचार होणार आहे.

५. थेट द्वितीय वर्षाच्या पदवी प्रवेशासाठी शासकीय गुणवत्ता यादीतील गुण शिष्यवृत्तीसाठी ग्राह्य धरले जातील.

६. प्रत्येक सत्रात प्रत्येक विषयासाठी पंच्याऐंशी टक्के हजेरी व वार्षिक परिक्षेत सर्व विषयात पास होवून एकत्रितपणे पंचावन्न टक्के गुण (किंवा एकत्रित सी.जी.पी.आय. समकक्ष गुण) मिळवण्याच्या अटीवर ही शिष्यवृत्ती पदवीधर होईपर्यंत सुरु राहू शकेल.

७. या शिष्यवृत्तीच्या विविध जागा प्रत्येक तुकडी/शाखा व संस्थेमध्ये राखीव असून प्रत्येक अर्जदार विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी त्या राखून ठेवायच्या असून शासकीय प्रवेश प्रक्रियेतील प्रत्येक फेरीत प्रवेश मिळताच आमच्याच संस्थेत त्या जागेवर प्रवेश घेतला तरच सदर शिष्यवृत्ती लागू होईल.

८. प्रवेश रद्द केल्यास ही शिष्यवृत्ती आपोआप रद्द होईल.

९. ही शिष्यवृत्ती शासकीय प्रवेश प्रक्रियेतून आमच्याच संस्थेत विद्यार्थ्यांने अर्ज करुन राखून ठेवलेल्या जागेसाठीच मर्यादित असून ही शिष्यवृत्ती संस्था स्तरावरील प्रवेशांना लागू नाही.

१०. विद्यार्थ्याने अर्ज करुन राखून ठेवलेल्या जागेवर शासकीय प्रवेश फेरीत प्रवेश मिळताच लगेच आमच्या संस्थेत प्रवेश घेतला तरच शिष्यवृत्ती लागू होईल. त्यापुढील फे-यात त्याची जागा व शिष्यवृत्ती आपोआप रद्द होईल.

११. अर्जदार विद्यार्थ्याने आमचे संस्थेत प्रवेश घेताना शिष्यवृत्ती वजा करुन उर्वरीत देय रक्कम पूर्णपणे भरुनच प्रवेश घेता येईल.

१२. शासकीय प्रवेश प्रक्रियेत अर्ज न केलेल्या व शासकीय गुणवत्ता यादीत नसलेल्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू नाही.

१३. शिष्यवृत्तीचा तुकडी, शाखा व संस्थावार जागा आणि त्या साठी आवश्यक अशा कमीत कमी गुणांचा तक्ता सोबत दिला आहे.

१४. जास्त शिष्यवृत्तीची जागा व प्रवेश राखून ठेवताना पात्र असूनही उपलब्ध नसल्यास कमी शिष्यवृत्ती असलेली जागा प्रवेशार्थिंना राखून ठेवता येईल व जास्त शिष्यवृत्तीची जागा उपलब्ध झाल्यास पात्र अर्जदार विद्यार्थ्यांना तुकडी, शाखा व संस्थावार त्या देण्याची व्यवस्था संबधित फेरीतच केली जाईल.

१५. कोणत्याही विद्यार्थ्याला/विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे संपूर्ण अधिकार संस्थेकडे राखून ठेवले आहेत.

१६. शिष्यवृत्ती धारकाला शाखा व महाविद्यालय बदलता येणार नाही.

१७. भरलेले अर्ज व अर्जाची फी रु. ५००/- ऑनलाईन अथवा डीडीने भरुन पावतीसह स्पिड पोस्टद्वारेही स्विकारले जातील. बँक खात्याचा तपशील वेबसाईटवर उपलब्ध आहे मात्र मुलाखतीसाठी अर्जदार व वडील / पालक यांचे ओळखपत्र आवश्यक आहे .